**निशाणी क्र.३८**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०५**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की –**

माझे नाव – निर्मला मारोती देवकत्ते,

वय – ४० वर्षे धंदा – शेती,

रा.जांब, ता. अहमदपूर, जि. लातूर.

**शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.एन. ए. भांगे**

**०१.** मी आरोपींना ओळखते. आरोपी न्यायालयात हजर नाहीत. आरोपींच्या गैरहजेरीमाफीचा अर्ज निशाणी ३६ वर आहे. फिर्यादी हे माझे पती आहेत. सन २०२४ च्या वेळाअमावस्याच्या अगोदरच्यादिवशी माझे पती शेताकडे गेले होते. त्यावेळी आरोपी क्र.१ व ४ यांनी माझ्या पतीला शिवीगाळ केली होती तसेच जिवे मारण्याची धमकी दिली होती. वेळाअमावस्याच्या दिवशी पुजा करून दोन ते अडीच वाजण्याच्या सुमारास माझे पती गावात जात होते. त्यावेळी आरोपी क्र.१ व ४ यांनी त्यांना अडवले. त्यांनी माझ्या पतीला शिवीगाळ करून धोंड्याने मारले. त्यामुळे त्यांना डोक्यात मार लागला. आम्हाला गर्दा ऐकू आल्याने आम्ही गेलो. माझे तिघे मुले व मी गेलो होतो. आम्ही सोडवासोडव केली. आमचे भाचे अक्षय करले व प्रल्हाद कांबळे आले. माझ्या डोके फुटले असल्याने राजू होणराव यास आम्ही बोलावून घेतले होते. रोजू होणरावसोबत आम्ही माझ्या पतीला अहमदपूर येथील सरकारी दवाखान्यात पाठवले. त्यापुढचे मला माहीत नाही. पोलीसांनी घटनेच्याअनुषंगाने माझ्याकडे विचारपूस केली होती.

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. बी. व्ही. कुमदाळे**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, वेळाअमावस्याच्यादिवशी मी, माझे मुले व पतीने आरोपी क्र.१ ला कत्तीने व दगडाने मारले होते. त्या घटनेवरून आमच्याविरूध्द

अहमदपूर पोलीस स्टेशनला गु.र.नं. १९/२०२४ दाखल आहे किंवा कसे ते मला माहीत नाही. त्या केसमध्ये आम्ही जामीन करून घेतला आहे किंवा कसे ते मला माहीत नाही. आम्ही केससंदर्भात अहमदपूर न्यायालयात आलो होतो किंवा कसे ते मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ आमचा शेतशेजारी आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या व आरोपी क्र.१ च्या शेताला जाण्याच्या रस्त्यावरून दिनांक २७.०४.२०२३ रोजी आमच्याविरूध्द एक गुन्हा दाखल झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, तो गुन्हा आम्ही आरोपी क्र.१ चा धुरा जे.सी.बी.ने मोडल्यामुळे दाखल झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, आमच्याकडे जे.सी.बी. आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १०.०१.२०२४ रोजी माझ्या पतीने व मुलगा ओंकार याने आरोपी क्र.१ यास मारल्याने तो दिनांक ११.०१.२०२४ रोजी लातूर येथील दवाखान्यात ॲडमिट होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ चे दिनांक ११.०१.२०२४ रोजी लातूर येथे सि.टी.स्कॅन करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ यास दुसरा भाऊ नाही. हे म्हणणे खरे आहे की, वेळाअमावस्यादिवशी सर्व शेतकरी आपापल्या शेतात पुजेसाठी असतात. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ११.०१.२०२४ रोजी आरोपी क्र.१ त्याच्या शेतात पुजेसाठी हजर नव्हता. त्याच्या शेतामध्ये पुजेच्यावेळी कोण कोण होते ते मला माहीत नाही. आमच्या शेतातून आरोपी क्र.१ च्या शेतात पुजेसाठी कोण आले आहे ते दिसत नव्हते. अहमदपूर येथून जांब येथे मोटारसायकलवर जाण्यास किती वेळ लागतो ते मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वेळाअमावस्याच्या पुजा सकाळी ८ ते ९ वाजता उरकते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १०.०१.२०२४ रोजी आरोपी क्र.१ ते ४ यांनी माझ्या पतीला शिवीगाळ करून धमकी दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्यावेळी माझ्या घरातील तसेच भाच्चा अक्षय करले व प्रल्हाद कांबळे यांच्याव्यतिरीक्त तिथे कुणीही नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ११.०१.२०२४ रोजीची घटना मी खोटी कथन

केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही गर्दा ऐकून घटनास्थळावर गेल्याचे खोटे सांगत आहे. राजू होणराव आमच्या शेजारी नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे बयान घेतले नाही. बयानाची तारीख माझ्या लक्षात नाही. माझे बयान एकदा गावात येऊन घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पतीच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

**फेरतपास** काही नाही.

श्रृवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2025.12.10 15:08:21 +0530

**(श्रीमती स्वानंदी दे. वडगांवकर)**

दिनांक –०९.१२.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर.

न्या.द.प्र.वर्ग.

**निशाणी क्रमांक – ३७**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४</u>**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –**

माझे नाव – जगदीश मारोती देवकत्ते,

वय – २० वर्षे धंदा – शिक्षण,

रा.जांब, ता. अहमदपूर, जि. लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.एन. ए. भांगे</u>**

**०१.** मी सर्व आरोपींना ओळखतो. आरोपी न्यायालयात हजर नाही. आरोपींच्या गैरहजेरीमाफीचा अर्ज निशाणी ३६ वर आहे. फिर्यादी हे माझे वडील आहेत. दिनांक १०.०१.२०२४ रोजी सायंकाळी ६.०० ते ६.३० च्या दरम्यान माझे वडील शेतातून घराकडे येत होते. त्यावेळेस आरोपी क्र.१ व ४ यांनी वादावादी करून भांडणाची सुरूवात केली. दुसऱ्यादिवशी दिनांक ११.०१.२०२४ रोजी दुपारी २ ते २.३० च्या दरम्यान माझे वडील शेतामध्ये वेळाअमावस्याची पुजा करून गावाकडे काम असल्याने जात होते. त्यावेळी आरोपी क्र.१ ते ४ यांनी माझ्या वडीलांना दगडाने, लाथा बुक्कयांनी मारहाण केली, त्यांना शिवीगाळ करून धमकी दिली. आरोपींनी माझ्या वडीलांच्या डोक्यात पुढील बाजूस मारले होते. आरोपींनी माझ्या वडीलांना 'आमच्या शेताजवळ दिसल्यास आम्ही जिवे मारू' अशी धमकी दिली. गर्दा ऐकून मी, माझे दोन भाऊ, माझी आई, माझा आत्येभाऊ अक्षय करले व प्रल्हाद कांबळे असे तिथे गेलो. आम्ही तिथे माझ्या वडीलांच्या डोक्याला मार लागून रक्त येत असल्याचे पाहिले. आम्ही सोडवासोडव करून बाजूला केले. आम्ही राजीव होणराव यांना फोन करून बोलावून घेतले व त्यांच्या गाडीवर माझ्या वडीलांना अहमदपूर येथील दवाखान्यात पाठवले. त्यानंतर वडीलांनी तक्रार नोंदवली. पोलीसांनी घटनेच्याअनुषंगाने माझ्याकडे विचारपुस केली होती.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. बी. व्ही. कुमदाळे</u>**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १०.०१.२०२४ रोजी माझ्या वडीलांनी

आरोपी क्र.१ च्या डोक्यात मारून त्यांना जखमी केले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याविरूध्द अहमदपूर पोलीस स्टेशनला गु.र.नं.१९/२०२४ नोंदवलेला आहे. त्या गुन्ह्यावरून नियमीत फौजदारी खटला क्र.३२६/२०२४ प्रलंबित आहे किंवा कसे ते मला सांगता येत नाही. त्या केसमध्ये मी, माझी आई, वडील व दोन भाऊ आरोपी असून ती केस मारहाणीची आहे किंवा कसे ते मला सांगता येत नाही. त्या केसमध्ये मी आरोपी आहे किंवा कसे ते मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमचे व आरोपी क्र.१ चे शेत लागून आहे. हे म्हणणे खरे नाही की, रस्त्याच्या कारणावरून आरोपींनी माझ्याविरूध्द अदखलपात्र गुन्हा नोंदवलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १०.०१.२०२४ रोजी माझा भाऊ ओंकार व शिवकुमार यांनी आरोपी क्र.१ यास कत्तीने मारहाण केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी ओंकार याने आरोपी क्र.१ च्या डोक्यात दगड घातलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी आरोपी क्र.१ चे पत्नी व मुलगा भांडण सोडवण्यासाठी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांनाही लाथा बुक्क्यांनी मारहाण केली होती. दिनांक १०.०१.२०२४ रोजीच्या घटनेनंतर आरोपी क्र.१ यास शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर येथे दवाखान्यात दाखल करण्यात आले होते किंवा कसे ते मला माहीत नाही. दिनांक ११.०१.२०२४ रोजी आरोपी क्र.१ चे लातूर येथील दवाखान्यात सि.टी.स्कॅन करण्यात आले किंवा कसे ते मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ ला इतर भाऊ नाहीत. आमच्याकडे एक जे.सी.बी. व दोन मोटारसायकल अशी वाहने आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आमचा वाळूचा धंदा आहे. जांब ते अहमदपूर हे अंतर ७ किलोमिटर आहे. ते अंतर येण्यास १५ ते २० मिनीटे मोटारसायकलवर लागतात. पोलीसांनी माझे बयान दोन वेळेस घेतलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे बयान पोलीस स्टेशनला घेण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, वेळाअमावस्याच्यादिवशी प्रत्येक जण आपापल्या शेतात पुजा करतात. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी सकाळी ८ ते ९ वाजता पुजा होते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ११.०१.२०२४ आरोपी क्र.१ त्याच्या शेतामध्ये नव्हता. आरोपी क्र.१ ला आम्ही माझ्या वडीलांना मारले त्याठिकाणी होता. भांडण वसंत होणराव यांच्या शेतात झाले होते.

**०३.** प्रल्हाद कांबळे घटनेच्यावेळी रस्त्याने जात होते. ते गर्दा ऐकून धावत आले होते. प्रल्हाद कांबळे यांना स्वतःची शेती आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रल्हाद कांबळे सुतार काम करतात. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्यावेळी आजुबाजूचे कुणीही आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांच्या डोक्यात कुणी मारले ते मी पाहिलेले नसल्याने मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेबाबत माझ्या वडीलांनी सांगितल्यावरून कळाले. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ११.०१.२०२४ रोजी कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दिनांक १०.०१.२०२४ रोजीच्या घटनेबाबत कोठे कथन केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १०.०१.२०२४ आरोपींनी आमच्याविरूध्द केलेल्या केससाठी शह देण्यासाठी आम्ही दुसऱ्यादिवशी हा खोटा गुन्हा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील आरोपीविरुध्द सर्व विधाने खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

**फेरतपास** काही नाही.

श्रृवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2025.12.10 15:08:29 +0530

**(श्रीमती स्वानंदी दे. वडगांवकर)**

दिनांक –०९.१२.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर.